नि.दि.दा..क्र. ६०/२०१९
दस्तगीर वि... भानुदास
नि.क्र. ७० वर पुढे

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र. २ यांचा उलट**तपास **वादीचे** विधीज्ञ श्री **के.एम. खांडेकर** यांच्या मार्फत **शपथे**वर सुरु :-

४. माझे वडील यांच्या नावे स.नं.९८/३ मध्ये ५ एकर १८ गुंठे जमीन होती. स.नं. ९८ /३ मधील मिळकतीला माझे वडील मयत झाल्यानंतर माझा भाऊ रसुलसाब यांचे नाव लागले होते आणि माझे देखील नाव ७/१२ उता-याला लागले होते. सन २००२ सालीचा बैनामा परत फिरवून देण्यासाठी मी, माझा भाऊ हुसेन यांच्याविरुध्द न्यायालयात कार्यवाही चालू केलेली नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, कार्यवाही चालू करणार आहे. हुसेनच्या नावे जो फेरफार झालेला आहे तो नाममात्र बैनामाच्या आधारे झालेला आहे, याच्या विरुध्द कोठेही तक्रार मी केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, स.नं. ९८/३ मधील सर्व जमीन एकत्र जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा स.नं.९८/३ मधील जमीनीवर कोणताही कायदेशिर अधिकार नाही.

५. हे म्हणणे खरे नाही की, इस्माईल आणि हुसेनला विरोध करण्यासाठी आणि भानुदासला मदत करण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा या दाव्याशी अर्थाअर्थी संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, दस्तगीर, महंमद, इस्माईल आणि हुसेन यांच्या जमीनी कोठे आहेत याबाबत मला कांहीही माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे सरतपासाचे शपथपत्र दाखल करुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही**.

श्रवणोत्तर स्विकृत.

DIVYA Digitally signed by DIVYA Date: 2025.07.03 16:54:39 +0530

ठिकाण :- चाकूर ( दिव्या सारंग करभाजन )

दिनांक :- ०३/०७/२०२५ सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, चाकुर